नि.दि.दावा क्र.२२३/२००६.
शालन यादव वगैरे विरुध्द
वसंत पाटील वगैरे.

## निशाणी क्र.११३ कडील आदेश

प्रतिवादी नं. ४ व २५ ने सदरच्या अर्जाद्वारे त्यांचेविरुध्द झालेला विनाकैफियत दावा चालविण्याचा आदेश रद्द करण्याची विनंती केली आहे.

२. अर्ज वाचला. अर्जातील कथनांप्रमाणे, प्रतिवादी नं.४ यांना उच्च रक्तदाबाचा त्रास, शुगरचा त्रास असलेने व वयोमानामुळे वारंवार आजारी असल्याने व घरगुती कौटुंबिक अडचणीमुळे दाव्याचे कामी हजर होवून मुदतीत कैफीयत दाखल करता आली नाही. तसेच प्रतिवादी नं.२५ हा प्रतिवादी नं.५ यांचा मुलगा असल्याने वडील घरातील कर्ते असल्याने ते दाव्यात हजर राहून आपली कैफीयत देतील अशा चुकीच्या समजुतीखाली राहील्याने दाव्याचे कामी हजर होवून कैफीयत देण्याचे अनावधानाने व विस्मरण झाल्याने राहून गेले आहे. सबब प्रतिवादी नं. ४ व २५ यांचेविरुध्द दावा विनाकैफियत चालविण्याचा हुकुम झालेला आहे. वादाचे कायमस्वरुपी निराकरण होण्याच्या दृष्टीने व उभय पक्षातील वाद विषय कायमस्वरुपी संपुष्टात येणेसाठी या प्रतिवादींची कैफियत दाखल करुन घेणे आवश्यक आहे. सबब प्रस्तुतचा अर्ज दिलेला आहे.

३. प्रस्तुत अर्जास वादीने हरकत घेतली असुन अर्ज खोटा असुन वादीला मान्य नाही. वादीला त्रास देणेसाठी सदरचा अर्ज दाखल केला आहे. सबब, त्यांनी अर्ज मंजुर करावयाचा असल्यास जास्तीत जास्त खर्च बसविण्याची मागणी केली आहे.

४. उभय पक्षांचा युक्तिवाद ऐकला. अभिलेख पडताळला.

५. प्रस्तुतचा दावा हा दावा मिळकतीचे सरसनिरसमानाने वाटप होवून मिळणेसाठी दाखल केलेला आहे. दाव्यामध्ये तांत्रिक अडचण राहु नये म्हणुन व या प्रतिवादींस त्याचा योग्य तो बचाव मांडता यावा याकरिता पुरेशी संधी देणे आवश्यक आहे. परंतु त्याने मुदतीत कैफियत दाखल केली नाही, ही बाब दुर्लक्षित करता येणार नाही. दाव्याचा गुणावगुणांवर निर्णय होण्याकरिता या प्रतिवादींची कैफियत अभिलेखावर घेणे न्यायोचित होईल. तथापि कैफियत दाखल

करण्यास या प्रतिवादींकडुन झालेला उशिर विचारात घेऊन त्याचेवर योग्य तो खर्च बसविणे न्यायोचित होईल.

६. उपरोक्त सर्व बाबींचा विचार करता, अर्ज मंजुर होण्यास पात्र आहे. परंतु झालेला विलंब पाहता, प्रतिवादीं यांचेवर रक्कम रु.५००/— इतका खर्च बसविणे न्यायोचित होईल. सबब मी पुढील आदेश पारीत करित आहे.

**: <u>आदेश</u> :**

१. अर्ज (नि.११३) रु.५००/— इतक्या खर्चासह मंजूर करण्यात येत आहे.

२. खर्चाची रक्कम या प्रतिवादी नं. ४ व २५ ने वादीस पुढील तारखेपर्यंत देण्याची आहे.

दिनांक :— २५/०२/२०१९.
कराड.

(आरती कुलकर्णी)
४थे सहदिवाणी न्यायाधीश, क.स्तर, कराड.